RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ८, अंक २७] सोमवार, सप्टेंबर १२, २०२२/ भाद्रपद २१, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ५५

प्राधिकृत प्रकाशन

अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०२२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९.—** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. . . . . | १-३ |


**ग्रामविकास विभाग**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१,
दिनांक १२ सप्टेंबर २०२२.

**MAHARASHTRA ORDINANCE No. IX OF 2022.**

**AN ORDINANCE**
**FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.**

**सन २०२२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९.**

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९६२ चा महा. ५. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (तिसरी सुधारणा) अध्यादेश, २०२२, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ७५ख ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे), याच्या कलम ७५ख मधील, विद्यमान परंतुके वगळण्यात येतील. १९६२ चा महा. ५.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ९१ब ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९१ब मधील, विद्यमान परंतुके वगळण्यात येतील.

## निवेदन

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) याची कलमे ७५ख व ९१ब ही, जेव्हा सर्व पीठासीन अधिकाऱ्यांची पदे एकाचवेळी रिक्त होतात तेव्हा, त्या पदांच्या सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्यांची सर्व कर्तव्ये पार पाडण्यासाठी अधिकाऱ्यांना प्राधिकार देण्याकरिता **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेला आदेश काढण्यासाठी राज्य शासनास अधिकार प्रदान करतात. उक्त कलमांच्या परंतुकांमध्ये अशी तरतूद आहे की, प्राधिकृत करण्याचा कालावधी, चार महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही आणि अपवादात्मक परिस्थितीमध्ये, उक्त कालावधी वेळोवेळी वाढविता येईल, परंतु, एकूण कालावधी, एकत्रितपणे सहा महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही.

**२.** २५ जिल्हा परिषदांचा व २८३ पंचायत समित्यांचा कालावधी, मार्च, २०२२ मध्ये समाप्त झाला आहे, म्हणून, उक्त कलमे ७५ख व ९१ब यांच्या परंतुकांन्वये आदेश काढून उक्त जिल्हा परिषदांवर व पंचायत समित्यांवर शासनाद्वारे प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

उक्त जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा सुधारित कार्यक्रम प्रक्रियाधीन असताना, विशेष विनंती याचिका क्र. १९७५६/२०२१ यामध्ये, सर्वोच्च न्यायालयाने, त्याच्या दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ च्या आदेशाद्वारे असा निर्देश दिला आहे की, पक्षकारांनी, पाच आठवड्यांच्या कालावधीसाठी जैसे थे स्थिती ठेवावी.

**३.** उक्त जिल्हा परिषदांवर व पंचायत समित्यांवर नियुक्त केलेल्या प्रशासकांचा पदावधी, सप्टेंबर, २०२२ या महिन्यामध्ये समाप्त होईल. तथापि, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे, उक्त कालावधी समाप्त होण्यापूर्वी उक्त जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या निवडणुका घेता येणार नाहीत. म्हणून, प्रशासकांच्या नियुक्तीच्या कमाल कालावधीची तरतूद करणारी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ याची उक्त कलमे ७५ख व ९१ब यांची परंतुके वगळणे इष्ट वाटते.

**४.** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे; म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १२ सप्टेंबर २०२२.

**भगत सिंह कोश्यारी,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेश कुमार,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.